**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 12 No.1** **Sept-Oct 2024**

# विश्ववेध : व्यवस्था, सत्ता आणि वर्चस्व-संघर्ष

**डॉ.दीपक सर्जेराव पाटील – शेटके**
विषय - राज्यशास्त्र - आंतरराष्ट्रीय राजकारण, राजाराम महाविद्यालय, कोल्हापुर
**Corresponding Author- डॉ.दीपक सर्जेराव पाटील – शेटके**
**DOI- 10.5281/zenodo.14015967**

"Political power grows out of the barrel of a gun."

- Mao Tse Tung

**प्रस्तावना:**

आज 21 व्या शतकाच्या आरंभीच्या दोन दशकपूर्ती नंतर तिसऱ्या दशकातील 2024 या वर्षामध्ये आपण विश्ववेध लक्षात घेऊया.

20 व्या शतकामध्ये जगाने 2 महायुद्धे अनुभवली. हिरोशिमा-नागासाकी (1945) चा अभूतपूर्व विध्वंस पाहिला. यु.एस.ए.-यु.एस.एस.आर. मधील शीतयुद्धरुपी (1945-1990) बहुआयामी संघर्ष व ईर्ष्या जगाने पाहिली. यु.एस.ए. चा व्हिएतनामधील संहार पाहिला. कोरिया युद्ध (1953), इस्त्रायल-अरब संघर्ष (1948, 1967, 1973), अफगाणमधील यु.एस.ए.-युए.एस.एस.आर. लष्करी हस्तक्षेप व तालिबानची निर्मिती, इराक-कुवेतचा संघर्ष (1989), महासत्ता युएसएसआरचे विभाजन (1991), भारत-पाक युद्ध (1948, 1965, 1971), बांग्लादेश मुक्तिसंग्रामातून बांग्लादेशाची निर्मिती (1971), भारत-चीन युद्ध (1962), जर्मनीचे एकीकरण (1989) इ. सर्व घडामोडींनी विसावे शतक बऱ्या-वाईट अर्थाने संस्मरणीय ठरले.

आज 21 व्या शतकात जग नव्या वळणावर-संघर्ष बिंदूवर उभे आहे. सत्ता संघर्ष व वर्चस्वाची विविध नवी रूपे पहायला मिळत आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारण ही राज्यशास्त्रातील एक स्वतंत्र ज्ञानशाखा किंवा अभ्यासाचा महत्त्वपूर्ण विषय मानला जातो. या ज्ञानशाखेतूनच आज जागतिक घडामोडींचा सखोल व वस्तुनिष्ठ अभ्यास सुरू आहे.

विचारवंत एच.जे. मॉर्गेन्थॉ यांच्या मते, "राष्ट्रा-राष्ट्रातील सत्तेसाठी चाललेला संघर्ष आणि सत्तेचा वापर म्हणजेच आंतरराष्ट्रीय राजकारण होय."

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासातूनच सद्य:कालीन विश्ववेध लक्षात घ्यावा लागतो.

**युनोची स्थापना (24 ऑक्टोबर 1945)**

दुसऱ्या महायुद्धाच्या अंतानंतर यु.एस.ए., इंग्लंडच्या पुढाकारातून संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना झाली. जागतिक शांतता, सहकार्य व परस्पर सामंजस्य निर्मितीसाठी ही संघटन कार्यरत आहे. जगातील 200 राष्ट्रे याचे सदस्य आहेत. न्यूयॉर्क येथे युनोचे मुख्यालय असून सुरक्षा समिती, महासभा व विशेषकृत अंगाच्या माध्यमातून (WHO, ILO, UNICEF, UNESCO) ही संघटना कार्य करते. परंतु आज जागतिक पटलावरील विविध संवेदनशील व स्फोटक प्रश्न, दोन राष्ट्रांतील युद्धे, शक्तिशाली राष्ट्रांची अरेरावी, अंतर्गत यादवी व हिंसाचार पाहता युनोचे अपयश व निष्क्रीयता स्पष्टपणे दिसून येते. युनोचे आदेश, सूचना व ईशारे नाममात्र व तकलादू असल्याचे दिसून येते.

1. यु.एस.ए., चीन, रशिया, इस्त्रायल, इराण, उ. कोरिया, क्यूबा, अफगाण, पाकिस्तान ही राष्ट्रे युनोला कितपत जुमानतात हा एक संशोधनाचा विषय आहे.
2. सुरक्षा समितीचे 5 सदस्य (स्थायी) यांची मक्तेदारी व नकाराधिकार हा सर्वात जटिल प्रश्न आहे.
3. जगातील सर्वात मोठी लोकशाही व लोकसंख्या असणाऱ्या भारताला युनोचे स्थायी सदस्यत्व कधी मिळणार?
4. नाटोच्या धर्तीवर युनोचेही सुसज्ज लष्कर हवे व लष्करी सराव/कवायती व्हाव्यात.
5. रशिया-युक्रेन, इस्त्रायल-हमास/हिजबुल्ला संघर्ष थांबवण्यामध्ये युनोचे योगदान हवे.

6. तालिबान, बोकोहराम, इसिस, लष्कर-ए-तोयबा, जैश, हिजबुल, हौथी, पीएफआय, खलिस्तान लिबरेशन फोर्स, बब्बर खालसा, हेजबुल या सर्व उपद्रवी व दहशतवादी गटांचा बिमोड करायला हवा.
7. चीनच्या विस्तारवादी आक्रमक भूमिकेला यूनोने वेसण घालावी. आंतरराष्ट्रीय निर्बंध लावावेत.
8. म्यानमारमधील जुंटा लष्करशाहीच्या दडपशाहीला हिंसाचाराला कायमस्वरूपी आळा बसायला हवा.
9. तिबेटची चीनच्या विस्तारवादातून मुक्तता व्हायला हवी. तिबेटला स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्राचा दर्जा मिळावा. संरक्षण मिळावे.
10. इस्त्रायल-पॅलेस्टाईन या जुन्या संघर्षावर युनोच्या पुढाकारातून शाश्वत असा शांततामय तोडगा निघायला हवा.
11. युद्धग्रस्त प्रदेशातून स्थलांतरित-निर्वासित झालेले लोक आज नवे आंतरराष्ट्रीय आव्हान आहे. याबाबत युनोने स्थायी उपाययोजना करायला हवी. उदा : रोहिंग्या मुस्लीम, बांग्लादेश-अफगाण मधील अल्पसंख्यांक इ.

**व्यवस्था:**

आज नवीन जागतिक व्यवस्था आकारास येत आहे. ज्यामध्ये यु.एस.ए. च्या एक ध्रुवीय नेतृत्वाला आव्हान दिले जात आहे. यु.एस.ए. ला आज थेट सामना करण्याचे धाडस चीनचे आहे. चीनने मागील काही दशकात केलेली वेगवान प्रगती आणि त्यांचे अवाढव्य लष्करी आर्थिक बळ या जोरावर चीन आज तैवान, भारत, जपान, द. कोरिया इत्यादी देशांना अरेरावी करत आहे. हिंदी महासागर, बंगालचा उपसागर, आशिया-पॅसिफिक या समुद्री क्षेत्रात चीनने नवा विळखा घातलेला आहे. आशिया-आफ्रिकेतील लहान राष्ट्रांना कर्जबाजारी करण्यात (श्रीलंका, पाकिस्तान, मालदीव, बांगलादेश, द.आफ्रिका) त्यांना अंकित करण्यात चीनचे धुर्त असे कारस्थान आहे. उ.कोरिया, इराण, रशिया, चीन, तुर्कस्थान, पाकिस्तान, मलेशिया ही नवी कुटील नीतीची युती आकारास आली आहे.

भारताने आज पुन्हा एकदा अलिप्ततावादी राष्ट्रांचा गट पुनर्बांधणी करत जागतिक राजकारणात आशावादी नेतृत्व करायला हवे. भारत आज सार्क, आशियान, सांघाय सहकार्य, बिमस्टेक, ब्रीक्स, G-20 या जागतिक संघटनांतून आपले नेतृत्व व प्रभाव टिकवून आहे. आज भारत क्वाडचाही सदस्य आहे. युनोच्या सुरक्षा समितीचे स्थायी सदस्यत्वाचा भारत प्रबळ दावेदार आहे. मध्यपूर्व आशियात आज जे युद्धजन्य वातावरण निर्माण झाले आहे किंवा रशिया-युक्रेन युद्धात भारताने शांततामय मध्यस्थी व सामोपचाराची भूमिका घेतली आहे. तुर्कस्थान, येमेन, पाकिस्तान, नेपाळ, पॅलेस्टाईन, लिबिया, सुदान या राष्ट्रांत भारताने आपत्कालीन बचाव व मदतकार्य मोठ्या प्रमाणावर केले आहे. जपान, इस्त्रायल, अफगाण, इराण, भूतान, बांग्लादेश, द.कोरिया, रशिया ही राष्ट्रे भारताचे विश्वासू मित्रदेश आहेत.

नव्या विश्वरचनेत चीनची राक्षसी महत्त्वाकांक्षा व अरेरावी हा चिंताजनक विषय आहे. आज भारताचा क्रमांक एकचा शत्रू हा चीन असल्याचे मानले जाते; कारण चीन हा जगामध्ये उ. कोरिया, येमेन, इराण, पाकिस्तान, तुर्कस्थान, नेपाळ, श्रीलंका, मालदीव, अफगाण या राष्ट्राची भारतविरोधी मोट बांधत आहे. तर यु.एस.ए. प्रणीत जपान, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, फ्रान्स, जर्मनी, स्वीडन, द. कोरिया, इस्त्रायल, सौदी अरेबिया, यु.ए.ई. या देशांची आघाडी निर्माण झाली आहे. आज जागतिक संघटनांवर यु.एस.ए. प्रणीत युरोपियन राष्ट्रांचे सर्वस्व आहे. या वर्चस्वाला शह देण्याचे कार्य चीन करत आहे. गरीब व यादवीग्रस्त आफ्रिकन राष्ट्रे आजही तिसऱ्या जगातच आहेत.

**वर्चस्व-संघर्ष:**

20 व्या शतकात जगाची विभागणी पहिले जग (विकसित), दुसरे जग (विकसनशील) व तिसरे जग (मागास, अविकसित) अशी झाली. आज 21 व्या शतकाच्या पुर्वार्धातही हीच विभागणी कायम असल्याचे दिसते. आजही संपत्ती, सुबत्ता, साक्षरता विकास, भांडवल, गुंतवणूक, दरडोई उत्पन्न, संरक्षण, अर्थव्यवस्था, उत्पादन या निकषावर युरोप-अमेरिका अग्रेसर व प्रगत आहेत. तर जगातील सर्वाधिक लोकसंख्या दारिद्र्य, गरिबी, हिंसाचार, कुपोषण, भूकबळी, अराजकता, दंगली, निरक्षरता, अत्यल्प दरडोई उत्पन्न यामध्ये अग्रभागी आशिया-आफ्रिकन देश आहेत.

भारत-चीन सीमा विवाद, चीनचा तैवाण, जपान, द. कोरियाशी असणारा संघर्ष, रशिया-युक्रेन युद्ध, इस्त्रायल-पॅलेस्टाईन युद्ध, पाकिस्तान-भारतादरम्यानचा काश्मीर प्रश्न, पाकिस्तानमधील बलुचिस्थान लढा, इराक-कुवैत, सौदी-इराणचे वैर ही सर्व वर्चस्व संघर्षाची संवेदनशील उदाहरणे आहेत. शिया-सुन्नी संघर्ष, इस्लाम-हिंदू, ख्रिश्चन-

इस्लाम, शीख-हिंदू संघर्ष, तामिळ विरुद्ध सिंहली, बांग्ला, उर्दू, इस्लाम विरुद्ध बौद्ध ही सर्व धार्मिक संघर्षाच्या वर्चस्वाची उदाहरणे आहेत. वर्चस्व संघर्षाचा इतिहास फार जुना आहे. आज आधुनिक काळात याला सुधारित नववसाहतवाद-साम्राज्यवादाचे रूप लाभले आहे. उदा : नाटोचा विस्तार.

जागतिक तापमानवाढ व हवामान बदलाचा सर्वाधिक फटका हा गरीब व विज्ञान-तंत्रज्ञानात मागास राहिलेल्या राष्ट्रांना बसणार आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी, नफेखोरी व लबाडीचाही सर्वाधिक फटका हा गरीब-विकसनशील राष्ट्रांनाच बसत आहे. विकसित राष्ट्रांचा गट/समूह हा नेहमी स्वहित-स्वार्थासाठी गरीब राष्ट्रांचा बळी देत आला आहे. त्यातूनच जगामध्ये आर्थिक विषमता वाढली. साम्यवादाला बळ प्राप्त झाले. लष्करशाही-हुकूमशाही निर्माण झाली.

आजचे जग हे निरनिराळ्या म्हणजेच वांशिक, धार्मिक, भाषिक, आर्थिक, व्यापारी, जातीय व प्रादेशिक, पर्यावरणीय संघर्षांनी तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने वेगाने जाते की काय? अशी भाकिते मांडली जात आहेत.

"International politics like all politics is a struggle for power."

- H.J. Morgenthan

जगामध्ये सत्तासंतुलनाचा प्रयोग सतत चालूच राहील, परंतु हा प्रयोग शांततामय, विकासाभिमुख व सर्वसमावेशक असायला हवा. संरक्षण युद्धसज्जता, लष्कर व संघर्षासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्सचा वापर अधिक भयावह असेल.

आजच्या जगामध्ये सर्वोदय-अंत्योदयाचे व अखिल मानव जातीचे कल्याण साध्य करण्यासाठी हार्ड पॉवर ऐवजी 'सॉफ्ट पॉवर' (क्रीडा, साहित्य, कला, संस्कृती, शिक्षण, पर्यटन, चित्रपट, रंगभूमी) अधिक सरस व परिणामकारक ठरेल.

**संदर्भ**


1. करंट-अंडरकरंट-श्रीराम पवार
2. आंतरराष्ट्रीय घडामोडी-वा.दा. रानडे
3. जागतिक घडामोडी-परिमल माया सुधाकर